नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 19/06/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## नागपूर ग्रामीण हद्दीतील काटोल, कळमेश्वर व पांढुर्णा जिल्हा छिंदवाडा येथील 03 मोटर सायकल हस्तगत करून आरोपी जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 18.06.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल उपविभाग नागपूर ग्रामीण परिसरात पेट्रोंलीग दरम्यान खात्रीशीर गोपनिय माहिती मिळाली की, काटोल परिसरातील डोंगरगाव रोड वरील क्रिस्टल विला ढाब्या समोर मोटर सायकलसह उभ्या असलेला इसमाकडे असलेली मोटर सायकल चोरीची असण्याची शक्यता आहे. अशा माहितीवरून क्रिस्टल विला ढाब्या जवळ जावुन संशयीत इसम यास नाव, पत्ता विचारले असता त्याने आपले नाव केन उर्फ ज्ञानेश्वर वासुदेव गायकवाड वय 19 वर्षे, रा. सावरगाव रोड जाम नदी, तह. काटोल जिल्हा नागपूर असे सांगितले त्यास मोटर सायकल क्र. एमएच 40 डब्ल्यु 6661 व त्याचे कागदपत्रा बाबत विचारणा केली असता तो उडवाउडवीचे उत्तर देत असल्याने त्याचे ताब्यातील मोटर सायकल चोरी ची असल्याचा संशय आला. त्यास विश्वासात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्याने त्याचे ताब्यातील मोटर सायकल क्र. एमएच 40 डब्ल्यु 6661 ही मोटर सायकल गळपुरा चौक काटोल येथुन चोरी केल्याचे सांगितले. सदर आरोपीस आणखी विचारपुस केली असता मौजा येरला ता. कळमेश्वर व पांढुर्णा जिल्हा छिंदवाडा येथुन प्रत्येकी 1 अशी 02 मोटर सायकल चोरी केल्याचे सांगुन त्याने ठेवलेल्या ठिकाणावरून आरोपीकडुन हस्तगत करण्यात आले. अशाप्रकारे सदर आरोपी कडुन एकुण 03 मोटर सायकल एकुण कि. 1,15,000/– रु चा माल जप्त करून आरोपी व मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईस्तव पोस्टे काटोल यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर राऊत, नापोशि राजेंद्र रेवतकर, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, विपीन गायधने, अमोल वाघ, चालक पोलीस नायक अमोल कुथे व सायबर सेल येथील पोलीस शिपाई सतिश राठोड यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर